**महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग, जिल्हा परिषद नांदेड**

दुरध्वनी क्रमांक- ०२४६२-२३४६१४ **Email ID- dhonanded4@gmail.com**

जा.क्र.जिपनां/आरोग्य/आस्था-२/3123/२०२६ दिनांक /०४/२०२६ 17 APR 2026

प्रति,
१. तालुका आरोग्य अधिकारी,
तालुका (सर्व) जि. नांदेड
२. वैद्यकिय अधिकारी,
प्रा.आ.कें./ना.द.---------------- (सर्व) जि. नांदेड

**विषयः- सर्वसाधारण बदल्या सन २०२६ साठी कर्मचा-यांची (आरोग्य सेविका) या पदाचीप्राथमिक वास्तव्य जेष्ठता यादी प्रसिध्द करण्या बाबत.**

**संदर्भः- १. शासन निर्णय ग्रा.वि.वि. शासन निर्णय क्र.जिपब-४१४/प्र.क्र.-११२/आस्था-१४ दि. १५.०५.२०१४**
**२. शासन निर्णय ग्रा.वि.वि. शासन शुध्दीपत्रक क्र.जिपब-४८१६/प्र.क्र.-१३६/आस्था-१४ दि. ०२.०१.२०१७**
**३. शासन निर्णय ग्रा.वि.वि. शासन शुध्दीपत्रक क्र.जिपब-११२५/प्र.क्र.-१२५/आस्था-१४ दि. २३.०५.२०२५**

जिल्हा परिषद मध्ये गट क(वर्ग-३) व गट ड (वर्ग-४) च्या कर्मचा-यांचे बदल्या संदर्भीय क्र. २ अन्वये विनंती बदली ४ वर्ष सलग सेवेनंतर ५%पर्यंत व संदर्भ क्र. ३ अन्वये आदिवासी/नक्षलग्रस्त तालुक्यातुन अन्य तालुक्यात १०% अनिवार्य च्या मर्यादित करण्याचे निर्देश आहेत. उपरोक्त शासन निर्णयान्वये निर्देश दिल्यानुसार आरोग्य विभागातंर्गत आरोग्य सेविका या संवर्गात कार्यरत कर्मचा-यांची सर्व साधारण बदल्या२०२६साठी प्राथमिक वास्तव्य जेष्ठता यादी या सोबत प्रसिध्द करण्यात येत आहेत.

प्रसिध्द करण्यात आलेल्या प्राथमिक वास्तव्य जेष्ठता याद्या आपल्या अधिनिस्त प्राथमिक आरोग्य केंद्रातंर्गत कार्यरत सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणुन देण्यात याव्यात. काही कर्मचारी ऐन बदल्याच्या वेळेस आपले आक्षेप सादर करतात यावरुन आपण प्राथमिक वास्तव्य जेष्ठता याद्या संबंधित कर्मचा-याच्या निदर्शनास आनुन देत नसल्याचे दिसुन येते. सर्वसाधारण बदल्या पारदर्शी होण्याच्या दृष्टीने प्राथमिक वास्तव्य जेष्ठता याद्या सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आनुन देणे आवश्यक आहे. जेणे करुन संबंधित कर्मचारी त्यांच्या यादीवर असलेले आक्षेप विहित मुदतीत सादर करु शकतील.

तेव्हा आपणास सुचित करण्यात येते की, प्रसिध्द करण्यात आलेल्या प्राथमिक वास्तव्य जेष्ठता यादी आपल्या अधिनिस्त कर्मचा-यांच्या निदर्शनास आणुन यादीवर संबंधिताचे कांही आक्षेप असल्यास पुराव्यासह एकत्रीतकरुन व आक्षेप नसल्यास संबंधिताकडुन आक्षेप नल्याचे लेखी घेवुन आपल्या अभिप्रायासह **चार दिवसाच्या आत खास दुतामार्फत** या कार्यालयास सादर करावेत. यादी निदर्शनास आली नाही असा एकही कर्मचारी राहणार नाही याची दक्षता घ्यावी. अन्यथा त्यांची संपुर्ण जबाबदारी आपल्यावर राहील. बदली पात्र कर्मचा-यांची अंतिम वास्तव्य जेष्ठता यादी प्रसिध्द करावयाचे असल्याने प्राप्त होणारे आक्षेप संदर्भिय शासन आदेशात नमुद कालावधीत सादर करावे. सदर कालावधी नंतर प्राप्त आक्षेप ग्राहय धरले जाणार नाहीत. तसेच उपकेंद्र निहाय रिक्त पदांची माहिती सोबत सादर करण्यात यावी.या कामी दिरंगाई झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील यांची गांर्भियाने नोंद घ्यावी.

सदरील यादी नांदेड जिल्हा परिषदेच्या WWW.NandedZP.in या संकेत स्थळावरुन प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नांदेड करीता

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner